# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्र** **ता. ९ ऑगस्ट २०१९**

# रस्त्यावरील खड्डे बुजविण्याबाबत तातडीने कार्यवाही करा!

## स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांचे निर्देश

**नागपूर, ता. ९ :** शहरातील मुख्य मार्ग व इतर मार्गावरील खड्ड्यांमुळे नागरिकांना अनेक प्रकारचे त्रास सहन करावे लागतात. पावसाळ्यामध्ये खड्ड्यांमध्ये पाणी जमा होत असल्याने अपघाताचाही धोका निर्माण होतो. रस्त्यावरील खड्डे बुजविण्याबाबत तातडीने कार्यवाही करा, असे निर्देश स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी दिले.

शहरातील खड्ड्यांबाबत स्थानिक प्रतिनिधींकडे नागरिकांच्या अनेक तक्रारी येतात. शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटना घडू नयेत याबाबत उपाययोजना करणे ही मनपाची जबाबदारी आहे. त्यामुळे यावर हॉटमिक्स विभागाने

गांभीर्याने कार्य करून त्वरीत संपूर्ण खड्डे बुजविण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच नागरिकांकडून खड्ड्यांबाबत येणा-या तक्रारीवर दखल घेत प्राधान्याने उपाययोजना करावी, असे निर्देश स्थायी समिती सभापती प्रदीप पोहाणे यांनी दिले.

त्याअनुषंगाने शहरातील विविध ठिकाणी १२ मी. पेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यावर खड्डे/पॅचेस तातडीने बुजवून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देणे ही हॉटमिक्स विभागाची जबाबदारी आहे. याबाबत नागरिकांच्या तक्रारी असल्यास त्यांनी कार्यकारी अभियंता रामचंद्र खोत (9823065586), उपअभियंता सचिन रक्षमवार (9823085423), सहायक अभियंता प्रशांत सोनकुसले (9823316644), कनिष्ठ अभियंता उदयसिंग खंडाते (9823098361) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.